Maharashtra Mandal
mmla
Los Angeles

# उत्सव

## दिवाळी २०१५



# असामी

***आशिष महाबळ***



काश्मीर (MMLA दिवाळी २०१४), कन्याकुमारी; अलाहाबाद, भुवनेश्वर, चंदिगड आदिचे दर्शन झाले होते. उत्तर-पुर्वेकडिल सात बहिणीना भेट देणे मात्र अजून झाले नव्हते. त्यामुळे ते॑पूरला होऊ घातलेल्या धुळीवरील सम्मेलनाबद्दल कळताच मनाने उचल खाल्ली. अर्थात ही धूळ साधी-सुधी नसून अवकाशीय होती. आपले विश्व हायड्रोजनमय आहे. उर्वरीत बहुतांश भाग हिलियम आहे. उरलंसुरलं अगदी नगण्य वस्तुमान कर्ब, नत्र वगैरेपासून




बनलेल्या इतर रेंणूमुळे. या रेणूंना सरसकटपणे धूळ या क:नामाने संबोधले जाते. आज याप्रकारावर माझे मुख्य संशोधन नसले तरी डॉक्टरेटसाठीचा माझा प्रबंध महाकाय रेडिओ-दिर्घीकांमधील अशा धुळीसंबंधीच होता. तेंव्हाची धूळ शोधण्याची काही तंत्रे आताच्या दिर्घीकांच्या मोठ्या जंत्रीना लागू करता येणार होती. त्यावर भाषण देण्याचा मनसुबा कळवताच संयोजकांनी आनंदाने होकार भरला. मग लगेच प्रवासाची आखणी सुरु झाली. इथे आहे होय ते॑पुर? काझिरंगा जवळच आहे तिथून. बऱ्याच दिवसांपासून तिथेच जायचे मनात होते. आसपास काय आहे? आह, गुवाहाटी - बहुदा विमानाने आधी तिथेच जावे लागणार. आणि कामाख्य मंदिर तिथेच आहे. तिथल्या कॉटन कॉलेज विद्यापिठातही खगोलशास्त्रावरील त्यांना हव्या त्या उपविषयावर टॉक देता येईल. ईमेला-ईमेली करुन, प्रोफेसर सैकियांशी बोलून टॉकची तारीख, काझिरंगाच्या जुजबी तारखा वगैरे



ठरवून तिकीटं काढून झाली. आता गुगल डॉक्समुळे माहितीपण छान एकत्र जमा करून ठेवता येते. त्यासाठी मात्र पुरेसा वेळ पुरेसे दिवस आधी कधीच मिळत नाही आणि शेवटी धावाधाव होतेच.

गुवाहाटीला पोचताच नयनरम्य ब्रह्मपुत्राचे दर्शन झाले. भारतातील ही सर्वात रुंद नदी आहे. नद खरंतर. गुवाहाटीजवळच दिपोर बील नावाचं पक्षी अभयारण्य आहे. त्याची मात्र इतर अनेक शहरी तलावांप्रमाणेच गत झाली आहे - अरुंद आणि कचऱ्यानी भरपूर.

गाव पसरलेलं असल्यानी इतर ठिकाणांप्रमाणेच वाहतुकीचा त्रास सोडल्यास आसपासच्या ठिकाणांना भेट देण्यासाठी बस्तान म्हणून गाव चांगलं आहे. वेळ कमी असल्यानी खूप पर्यटनगिरी करता आली नाही. सोळाव्या शतकापासूनची मंदिरे असलेल्या हजोला मात्र जाणे झाले. येथे हिंदू, बौद्ध, आणि मुसलमानांची तिर्थस्थाने आहेत. हयग्रीव माधव आणि पोआ मेक्का सर्वात प्रसिद्ध आहेत.




भरपूर पायऱ्या, चांगले देखावे. पण मंदिरांची मात्र हवी तशी काळजी घेतली जात नाही हे स्पष्ट दिसते. मंदिराला तेल-तूप, हळदी-कुंकवाद्वारे ‘जिवंत’ ठेवण्याच्या नादात लोक प्राचीन वैभवाला नकळत-नवळत दफन करत असतात. हीच गोष्ट भारतातल्या अनेक जुन्या मंदिरांच्या बाबतीत दिसते. पुरीच्या मंदिरालातर इतके भयानक रंग दिले आहेत की देवाला तिथे रहावेसे वाटेल असे लोकांना वाटते कसे तेच समजत नाही. पोटाचा

संबंध असला की सर्वकर्मधर्म समभाव कसा साधता येतो ते तिथे काही ठिकाणी विक्रीला असलेल्या ‘Yo Naughty’, ख्रिस्ती क्रॉसेस वगैरेवरुन लगेच लक्षात येते.



पांडवानी अज्ञानवासात जवळच आश्रय घेतला होता असे म्हंटले जाते. जवळच एके ठिकाणी भिमाचे खाद्यपात्रही दाखवण्यात येते. त्याचे खाणे त्याच्यापाशी. नंतर ते□पूरला टोपल्यांनी भूत झोलकिया मिरच्या दिसल्यावर काही वर्षांपूर्वी एका मित्राकडे त्या



मिरचीच्या लोणच्याच्या तेलाचा जिभेला केलेला किंचितसा स्पर्श आणि त्यामुळे संपूर्ण तोंडात पसरलेली आग आठवली. काही दिवस या मिरच्या Scoville Scaleवर जगात अग्रक्रमी होत्या - दहा लाख Scoville Heat Units. नवे सर्व विक्रम कलम केलेल्या मिरच्यांचे असतात. सध्या ते रेकॉर्ड Carolina Reaperच्या नावे आहे. भारतीय सैन्याने भूत झोलकीयातील सत्वाचा वापर शस्त्रांमध्ये करणे सुरु केले आहे.

मूख्य परीषद छान पार पडली. अशा आडबाजूला असलेल्या मिटिंग्समूळे या छोट्या विद्यापिठातील लोकांचे उर्वरीत जगाशी संबंध दृढ होतात. पुण्यातील IUCAAचा या परीषदेच्या आयोजनात हातभार होता. जुन्या-नव्या अनेकांच्या भेटी झाल्या. पोस्टर्स पाहतांना आणि टॉक्सनंतर विज्ञानाबद्दल भरपूर चर्चा झाली, पुढे-मागे करता येतील अशा प्रॉजेक्ट्सबद्दलची देवाणघेवाण झाली. नेहमीप्रमाणे एक कल्चरल कार्यक्रम झाला, हिमालयाचं दुरून दर्शन झालं. खाण-पिणं झालं. कँपस हिरवगार असल्यानी तिथे पक्षीनिरिक्षणेही झाली. एक मित्र 24 वर्षांनी भेटला त्यामूळे शिळोप्याच्या भरपूर गप्पा झाल्या. विस्मृतीत गेलेले अनेक प्रसंग ताजे झाले. परिषद पार पडली आणि दुसऱ्या दिवशी काझिरंगाकडे कूच केली.

भारतात गेंडे नामशेष होत आले होते. काझिरंगामध्ये झालेल्या संवर्धनाच्या प्रयत्नांमुळे पुन्हा त्यांचा सुळसुळाट झाला




आहे, आणि आता त्यांना चक्क काझिरंगाच्या बकऱ्या म्हणून संबोधले जाते. आता त्या अभयारण्यात दोन हजारापेक्षा जास्त गेंडे आहेत. अजूनही पोचींग होत असतेच पण सामान्य लोक मात्र प्राण्यांच्या भल्यासाठी प्रयत्नशील असतात. त्या भागात अनेकदा पूर येतो. अशा वेळी गावातून जाणारा मुख्य रस्ता ओलांडून प्राण्यांना उंचीवर जावं लागतं. त्याचवेळी जर रस्त्यावरून गाड्या भरधाव जात असतील तर अनेक प्राणी मरणार. तसं होऊ नये म्हणून लोक साखळ्या करून उभे राहतात आणि प्राणी आले की गाड्या थांबवून त्यांना जाऊ देतात.

चांगल्या गाईड्सच्या नावाने मात्र इतर ठिकाणाप्रमाणेच इथेही बोंबच आहे. बहुतांश लोक केवळ गेंडे पाहण्यातच धन्यता मानतात. त्यामुळे अनेक गाईड्स त्यापलिकडचा विचारच करत नाहीत. मला प्राण्यांशिवाय पक्षी पाहण्यातही interest असतो. थोड्या प्रयत्नांमुळे पक्ष्यांचे थोडंफार ज्ञान असलेला एक पंटर मिळाला. पायाला इजा झाल्यामूळे तो गाडी चालवू शकत नव्हता त्यामुळे केवळ गाईड म्हणूनच बरोबर येऊ शकला. इतर वेळी जीपचा ड्रायव्हरच गाईड असतो म्हणे. गाडी चालवता चालवता पक्षी प्राणी कसे शोधणार कुणास ठाऊक. गाडीबरोबर असलेल्या मूक रायफलधार्या अर्थातच त्यादृष्टीने काही फायदा नसतो. हा पण बऱ्यापैकी ज्ञान असून भितभितच माहिती सांगत होता. अमेरीकेतील





नॅशनल पार्कइतकीच तेथील सुंदर व्यवस्था पाहयल्यानंतर साहजीकच वाटलं होतं की भारतात असा प्रयत्न करता आला तर किती छान होईल. थोडी चौकशी केल्यावर मात्र मुरलेल्या साटेलोट्यांमूळे ते कर्मकठीण आहे हे लक्षात आले.

दुसऱ्या संध्याकाळी पुन्हा एकदा त्या दोघांनाच अजून एका जीपसफारीसाठी हॅाटेलवर बोलावून घेतले. जंगलात खोलवर सैनीकांची एक छोटी तुकडी असते. त्यांच्यापैकी एक बाहेर होता.



गाडीची रिसीट देणाऱ्या अॉफिसरने आमची चक्क परवानगी मागितली की आम्ही आमच्या गाडीने त्या एका एक्स्ट्रॉ रायफलधाऱ्याला तेथपर्यंत नेऊ शकु का ते. दोघांनाही थोडं बोलकं करण्यात मला यश आलं. मग एकाने एका तलावाजवळ चक्क गाडी थांबवायला सांगून सकाळी दिसलेली पाण-घोरपड दिसते



का ते पाहिले आणि तसं नियमबाहय असून मला खाली यायची खूण केली. पाण्यात पसार होण्याआधी घोरपडीने चक्क दोन फोटो घेऊ दिले. आम्ही थांबत थांबत थोडे रमत गमतच आतपर्यंत पोचलो. आम्हाला चक्क चहाची अॉफर मिळाली, तिथल्याच झाडावरची थोडी बोरं तोडून खाता आली. सुर्यास्तानंतर आत थांबता येत नाही, पण आम्हाला मात्र आत जाता -जाताच उशीर झाल्यामूळे सुर्यास्त झाला तरी आम्हीआतच होतो. बरोबर एक रायफलधारी होताच. अंधारातील जंगल वेगळंच असतं.



जंगलाचा हा भाग पक्ष्यांसाठी प्रसिद्ध आहे. अनेक पक्षी तर दिसलेच, पण बरेच छोटे-मोठे प्राणी पण. गेंडे, हत्ती, सांबर, जंगली डुक्कर, पाणम्हशी. पक्ष्यांमध्ये अनेक पाणपक्षी, टकाचोर, घुबड वगैरे जवळजवळ पन्नास जातींचे पक्षी दिसले, तेही जीपमधून न उतरता. एका टिटवीने (Northern Lapwing) तर छान नाच करून दाखवला.

गेंडे हे अर्थातच मूख्य आकर्षण होते. काही लहान पिल्लेपण दिसली. एक गेंडा चिखलात मस्त लोळत होता. कातडी जरी गेंड्याची असली तरी तरी छोट्या किटकांना दूर ठेवायला आणि प्रखर सूर्यप्रकाशापासून वाचायला चिलखतावरच्या या चिखलाची मदत होते. हत्तींवरुनपण दोन फेऱ्या मारून झाल्या. गेंड्यांचे टेरेटोरीयल मार्कर्स तेंव्हा दिसले. त्यांच्याप्रमाणेच भव्य. त्यांच्या शेणामुळे र्‍होडोडेन्ड्रॉनची मोठी वर्तुळेच तयार होतात.



हत्तींचे अनेक कळप दिसले. पाण्यात (आणि चिखलात) डुंबून निघालेले. संथ, राजेशाही. काही छोटी कुटुंबेही दिसली. काही म्हातारे दंतहीन बिचारे वाटावे असे एकेकटे फिरतांनाही दिसले. प्राणी म्हातारे झाले की त्यांचा वृद्धाश्रमही जंगलच. जगतील तोवर जगतील. उर्वरीत टोळीला मागे खेचण्याचा त्यांना अधिकार नसतो. मानवाने मात्र तो





हक्क मिळवला आहे. शरीराने कृश असुनही आपल्यातले अनेक महत्वाची कार्ये करतात. त्याउलट त्या हक्काचा दुरुपयोग करणारेही असतात.

दोन दिवसांनतर परत फिरायची वेळ आली. पाय निघत नव्हता, पण जाणे भाग होते. यावेळी ब्रह्मपुत्राच्या पलिकडचा रस्ता निवडून नवव्या शतकातील मदन कामदेवच्या भग्नावशेषांना भेट दिली. खजुराहो सारखी काही शिल्प असलेलं हे मंदिरही भाविकांनी अर्धवट पुन्हा उभारलं आहे आणि पत्र्यांच्या एका शेड खाली कपड्यांनी झाकलेल्या उमा-माहेश्वराच्या अलिंगनबद्ध मुर्तीला पुजण्याचा आपला उपचार ते उरकतात. त्यांच्यासाठी स्थानमहात्म्य नावाला. सहा डोकी असलेल्या भैरवाबद्दल किंवा त्याच्या क्लिष्ट इतिहासाबद्दल कुणाला काही देणंघेणं नसणार. हेच आजच्या काशीतही दिसतं. विश्वेश्वराच्या मंदिराइतकीच गर्दी गेल्या शतकातच जन्म झालेल्या संतोषीमातेच्या मंदिरातही असते.



परतण्याआधी गुवाहाटीत शेवटच्या दिवशी अर्थातच कामाख्यमंदिरासाठी वेळ ठेवला होता. तांत्रीक पद्धतीचं हे एक महत्वाचं तीर्थ. एकीकडे काझिरंगात लोक साखळ्या बनवून प्राण्यांना



मदत करतात, दुसरीकडे केवळ गोमांस खाल्याच्या संशयावरून मनुष्यप्राण्यांची हत्या होते, तर इथे अजूनही देवीचे मंदिर बैलाच्या बळीशिवाय उघडत नाही. रोज पन्नास ते दोनशे प्राण्यांची कत्तल होते, आणि गाईला माता मानणाऱ्या समाजाला हे मान्य आहे. सती येथे शिवाबरोबर राहण्यासाठी येत असे. तिच्या मृत्युनंतरच्या शिवाच्या तांडवावेळी तिच्या शरीराचे अनेक भाग झाले आणि ठिकठिकाणी पडले. या ठिकाणी योनी पडल्याचा उल्लेख कालिका पुराणात आहे. मंदिराभोवती आत शिरुन देवीच्या योनीच्या दर्शनासाठी शेकडो लोकांची रांग असते. अर्थात डोळे व मनावरील पडद्यामुळे इतरवेळी योनीला अशुद्ध मानणाऱ्यांसाठी मात्र सर्व तिर्थमय असतं, पवित्र असतं. प्राण्यांच्या बळीनंतर कबुतरं हवेत सोडली जातात. 501 रुपये भरून मी फास्टलेनचं तिकीट काढलं. 15 मिनीट झाल्यावरही ती रांग हलेना. सामान्य रांगेत किती वेळ लागत असेल कुणास ठाऊक. जास्त वेळ नसल्यानी मी





बाहेर पडलो. तिकीटाच्या खिडकीपाशी जाऊन सांगितल्यावर त्यांनी चक्क 500 रुपये परत केले.

काझिरंगा, भूत झोलकीया, अवकाशीय धुळीची आठवण काढत, आणि मनोमनी पुन्हा परतण्याची खूण बांधत अस्मादिकांनी विमानतळाकडे कूच केली.